॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

1990 'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)


जा.क्र. : कबचौउमवि/७-अ/दी.स.-३०/१२७३/२०२२ दि. : २३/०५/२०२२

प्रति,
सर्व सेवानिवृत्त प्राध्यापक,
अधिकारी व कर्मचारी,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
यांना. . .

महोदय/महोदया,

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा ३० वा दीक्षांत समारंभ **माननीय श्री. भगत सिंह कोश्यारी, राज्यपाल (महाराष्ट्र राज्य) तथा कुलपती कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव** यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार, दिनांक २४ मे, २०२२ रोजी सकाळी ९.३० वाजता विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. या समारंभास अतिथी म्हणून **मा. ना. श्री. उदयजी सामंत,** उच्च व तंत्रशिक्षण मंत्री (महाराष्ट्र राज्य), **मा.ना. श्री. गुलाबरावजी पाटील,** पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री (महाराष्ट्र राज्य) तथा पालकमंत्री जळगाव जिल्हा आणि **मा. ना. अब्दुलजी सत्तार,** महसूल, ग्रामविकास बंदरे, खार जमिनी विकास, विशेष सहाय्य राज्यमंत्री (महाराष्ट्र राज्य) तथा पालकमंत्री धुळे जिल्हा हे उपस्थित राहणार आहेत. तसेच **मा. डॉ. भूषण पटवर्धन, चेअरमन, नॅशनल ॲसेसमेंट ॲन्ड ॲक्रिडेशन कौन्सिल (NAAC) बेंगलोर** हे आभासी पध्दतीने (Online) सहभागी होणार असून, दीक्षांत भाषण करणार आहेत. ह्या समारंभासाठी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

आपण मंगळवार, दिनांक २४ मे, २०२२ रोजी विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहामध्ये उपस्थित राहावे. दीक्षांत समारंभाची सांगता झाल्यानंतर शिक्षकभवन येथे भोजनाचे आयोजन करण्यात आलेले असून, आपण दीक्षांत समारंभास व भोजनास आवर्जून उपस्थित राहावे, ही आग्रहाची विनंती.

म.कळावे,

आपला स्नेहांकित,

(प्रा. किशोर फ. पवार)
**प्र. कुलसचिव**


उमविनगर, जळगाव - ४२५००१ (महाराष्ट्र) भारत , दुरध्वनी क्र.: ०२५७-२२५८४२८, २२५८४२९ फॅक्स क्र.: ०२५७-२२५८४०३,४०६
Umavinagar, Jalgaon - 425 001 (Maharashtra) INDIA, Telephone No. 0257- 2258428, 2258429
Fax No. 0257-2258403, 406. E-mail : registrar@nmu.ac.in Web: www.nmu.ac.in